# मराठ्यांचा इतिहास


प्रा. अश्विनी खवळे.

इतिहास विभाग

बी. ए. भाग ३

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

# भोसल्यांची वंशावळ (सन १७०७ ते १७१६पर्यंतची राजकीय स्थिती)



# पेशव्यांची वंशावळ

**(१) बाळाजी विश्वनाथ भट्ट (श्रीवर्धन)**

(ई. स .१६६० – १७२०) पत्नी : राधाबाई

**(२)बाजीराव (पहिला) (१७०० -१७४०)**

चिमाजी आप्पा (१७०३ – १७४०)

**(३)बाळाजी (नानासाहेब) (१७२१-१७६१)**

रघुनाथवर (राघोबा)(१७३४-१७८३)

(ऑक्टोबर,१७६३ अल्पकाल पेशवा )

विश्वासराव

पानिपतावर मृत्यू

**(४)माधवराव(१७४५-१७७२)**

**(५)नारायणराव**

(६) माधवराव(सवाई)

**(७)बाजीराव (दूसरा)**

चिमाजी

अमृतराव(दत्तक)

(१८०२ मध्ये अल्पकाल पेशवा )

नानासाहेब (धोंडोपंत)(दत्तक)

# अ) शाहूंची सुटका आणि बाळाजी विश्वनाथ

- युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांनी १७ व्या शतकाच्या मध्यावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठ्यांच्या स्वतंत्र राज्याची, हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.
- महाराजांनी डोंगराळ व खडकाळ प्रदेशातील मराठमोळ्या माणसांचे संघटन करून सामान्य मराठी माणसात स्वाभिमान जागृत करून त्यांना स्वराज्य, स्वधर्म, स्वदेश, स्वभाषा व स्वसंस्कृती यांच्या रक्षणासाठी लढण्याची व प्रसंगी आत्म-समर्पण करण्याची प्रेरणा दिली.
- अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी आदिलशाही, कुतुबशाही, मुघल , सिद्दी, पोर्तुगीज व इंग्रज यांसारख्या प्रबळ सत्तांशी संघर्ष करून मराठी सत्तेला स्थिर पायावर उभे केले.
- छत्रपती शिवाजी महाराजानी स्वत:च्या राज्याभिषेकाद्वारा स्वतंत्र व सार्वभौम राजसत्तेची निर्मिती केली. एतद्देशीय हिंदू लोकांना राजसिंहासन व राजा दिला.





शिवकाळात महाराष्ट्रात स्वराज्य, स्वातंत्र रक्षणाची प्रेरणा इतकी प्रखर होती की, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी सर्वसामर्थ्यनिशी दक्षिणेत आलेल्या औरंगजेबाला मराठ्यांनी सळो की पळो करून सोडले.

छत्रपती संभाजी ,छत्रपती राजाराम व महारानी ताराबाई यांच्या काळात स्वराज्य व स्वधर्म रक्षणासाठी प्राणार्पण करण्याची जिद्द कायम होती. तर छ. संभाजी महाराजनी त्यासाठी स्वीकारलेल्या हौतात्म्यामुळे ती आणखी प्रकार बनली.

मराठ्यांचे राज्य नष्ट करण्यासाठी दिल्लीपती औरंगजेब बादशहा महाराष्ट्रात सर्वशक्तिनिशी उतरला. तो महाराष्ट्रात २५ वर्षे वणवण भटकला पण त्यास मराठ्याचे  राज्य जिंकून घेता आले नाही. अखेर त्याचे दफन या महाराष्ट्रात झाले.

# छत्रपती संभाजी महाराज





# महाराणी येसूबाई




२० फेब्रुवारी १७०७ मध्ये औरंगजेबचा मृत्यू ही घटना हिंदूस्थानाच्या इतिहासाला एक वेगळे वळण देणारी घटना होती

औरंगजेब बादशहाच्या काळातच खिळखिळे झालेल्या मुघल साम्राज्याच्या ऱ्हासास सुरुवात झाली. या संधीचा फायदा मराठ्यांनी घेतला

# छत्रपती राजाराम महाराज





# छ.ताराराणी








# औरंगजेब बादशहा






# छत्रपती शाहूंची सुटका व मराष्ट्रातील यादवी


❖छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ई. स १६८९ मध्ये मुघल सरदार झूल्फीकारखानचा वेढा रायगडास पडला होत.

❖छत्रपती राजाराम महाराज या वेढ्यातून निसटून कर्नाटकातील जिंजी येथे गेले. थोड्याच दिवसात रायगड मुघलांच्या ताब्यात गेला. (नोव्हेंबर, १६८९) या वेळी झुल्फीकारखनाने राणी येसूबाई, संभाजी पुत्र शाहू, छ. शिवाजी महाराजांची पत्नी सकवारबाई यांना तसेच राजकुटुंबातील इतर लोकांना कैद केले.

❖स्वराज्याचा वारसा छ. शाहू औरंगजेबचे कैदी झाले. तेव्हा त्यांचे वय ७ वर्ष होते.

# किल्ले रायगड




# छत्रपती शाहूंचे पूर्वायुष्य

- छ. संभाजी व राणी येसूबाई यांच्या पोटी १८ मे, १८८२ रोजी शाहूंची जन्म झाला. शाहूंचे पहिले नाव 'शिवाजी' होते. औरंगजेबाच्या कैदेत असताना त्यांचे नाव 'शाहू' असे पडले.
- शाहू मुघलांच्या १८ वर्षे कैदेत होते. औरंगजेबाने शाहूस राजा हा किताब दिला होत.
- शाहू बरोबर मुघल कैदेत असलेले रायभानजी भोसले (शहाजींच दासीपुत्र), मदनसिंह (संभाजीचा दासीपुत्र) व जोत्याजी केसरकर ही त्यांचे खरे सल्लागार होते व हितचिंतक होते . यातील जोत्याजी केसारकर यांनी शाहूना लष्करी शिक्षण दिले.
- मुघल कैदेत असताना शाहूंची दोन लग्न झाले. पहिली पत्नी राजसबाई ही लखुजी जाधवरावांच्या घराण्यातील रुस्तुमराव मानसिंगराव जाधवरावांची मुलगी होती. दुसरी पत्नी अंबिकाबाई ही कन्हेरखेडच्या शिंद्याची मुलगी होय
- मुघल कैदेत असताना महाराणी येसूबाई फार हुशारीने आणि मुत्सद्देगिरीने वागल्याचे दिसते.
- औरंगजेबची सर्वात लहान मुलगी झीनतुन्नीसा बरोबर तिचे आणि राणी येसुबाईचे  जिव्हाळ्याचे संबंध होते त्यामुळे शाहूंवरील अनेक संकटे टळली

# (छ. संभाजी पुत्र) छत्रपती शाहू महाराज



श्री. छत्रपति संभाजी महाराज.
( पुत्र शाहू राजे ह्यांसह. )






https://youtu.be/zqI_GlZeepo रायगडाला वेढा पडला असतानाच प्रसंग





# मुघल कैदेतून शाहूंची सुटका (८ मे, १७०७)

- २० फेब्रुवारी,१७०७ वार शुक्रवार रोजी अहमदनगर येथे औरंगजेबचा मृत्यू झाला आणि हिंदूस्थानच्या इतिहासाच्या नव्या पर्वाचा प्रारंभ झाला.
- दिल्लीचे तख्त व बादशाई मिळवण्यासाठी त्याचे पुत्र **आजमशाह** व **शहाआलम उर्फ मुअज्जम** यांच्यात संघर्ष सुरू झाला.




# बादशहाच्या मृत्यू वेळी शहाआलम हा उत्तरेत अफगाणिस्तानाच्या बाजूस होते








आजमशाह माळव्याच्या सुभेदरीवर निघाला होत. तो खानदेशात होता.





आजमशाहस बादशहाच्या मृत्यूची बातमी कळताच तो घाईघाईने अहमदनगरला आला. त्याने पित्याचा अंत्यसंस्काराचा विधी उरकला.





- औरंगजेबचे दफन त्याच्या इच्छेप्रमाणे औरंगाबादजवळील खुलदाबाद येथे त्याचे गुरु शेखजैनुद्दीन याच्या कबरी शेजारी करण्यात आले.
- त्यानंतर आजमशहाने स्वत: **बादशहा** झाल्याचे जाहीर केले






# औरंगजेबची कबर





# आजमशाह



- उत्तरेत असणाऱ्या शहाअलमच्या हाती सत्ता जाऊ नये म्हणून आजमशहाने वजीर आसदखान व झुल्फिकारखानसह उत्तरेचा रस्ता धरला.
- यावेळी शाहूंनी झीनतुन्नीसा बेगममार्फत सुटकेचा प्रयत्न करू लागले. मुघल सेनांनी झुल्फिकारखानामार्फत सुद्धा शाहूंनी कैदेतून सुटका होण्यासाठी प्रयत्न केले.
- झुल्फीकारखनाने आजमशाहस शाहूंची सुटका करण्यास सुचवले. कारण शाहू कैदेमधून मुक्त झाल्यास ते ताराबांईकडे वरसाहक्क मागतील त्यामुळे मराठी सत्ता कमकुवत होऊन मराठ्याच्यात यादवी युद्ध सुरू होऊन ते मुघल सत्तेस फायद्याचे ठरेल.

अखेर भोपाळच्या वायव्येस २० मैलावर दोराह येथे ८ मे,१७०७ मध्ये शाहूंची सुटका केली .

महत्त्वाचे म्हणजे कैदेत असलेल्या छत्रपतीच्या कुटुंबातील दुसऱ्या कोणासही मुक्त केले नाही.

सुटकेपूर्वी आजमशहा व शाहू यांच्यात करार केला.

# आजमशाह आणि शाहू यांच्यातील करार

१) मुघल साम्राज्याचा जहागीरदार म्हणून स्वराज्यावर राज्य करावे.


२) बादशहास आवश्यकता भासेल तेव्हा शाहूंनी सफौजा बादशहाची चाकरी करावी

३) दक्षिणेतील सहा सुभ्यातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करावी

हा करार तोंडी झाला होता. सनदा मागाहून तयार करून मिळणार होत्या

# छ. शाहूंचे स्वदेशी आगमन

- छ . शाहूंची सुटका झाली तेव्हा त्यांचे वय २५ वर्ष होते. त्यांच्या सोबत २०० स्वार होते. ते नर्मदा नदी ओलांडून खानदेशात आले.





Chhatrapati Shahu

धुळ्याजवळ असलेल्या लांबकानी येथे जून महिना मुक्काम केला.

तेथून त्यांनी स्वामींच्या सेवेत रूजू व्हावी असे पत्र लिहली त्याचा परिणाम होऊन अनेक सरदार शाहूंनी येऊन मिळाली.

ते सरदार पुढील प्रमाणे :-
१)परसोजी भोसले
२)नेमाजी शिंदे
३)हैबतराव निंबाळकर
४)रुस्तुमराव जाधव
५)गणेश शंकर सरनाईक
६)केसो त्रिमल पिंगळे
७)चिमणाजी दामोदर मोघे
८)पंताजी शिवदेव
९)हणमंते , पुरंदरे , बोकिल      या सर्वामुळे शाहूंची बाजू भक्कम झाली.

शाहू पुढे ऑगस्ट मध्ये अहमदनगर येथे आले. येथेच राजधानी स्थापन करावा असा विचार होता पण,

राजधानी सातारा ताब्यात घेतल्याशिवाय स्वराज्यावर राज्य करता येणार नाही त्यामुळे त्यांनी सातारा ताब्यात घेण्याचे ठरवले ; आणि

ताराबाईना कळवले की, "आम्ही निघून स्वदेशी परत येत आहोत, आता राज्य आम्ही करू. बादशहाची आज्ञा तशीच आहे. आपण मातोश्री आहात, मराठा राज्य आपल्या अनुमतीने व सल्ल्याने चालवले जाईल. आम्हाला आपला आशीर्वाद व अनुभव याचा विशेष उपयोग होईल."

परंतु ताराबाईनी निरोपाची दाखल घेतली नाही तर संघर्षाचा पवित्रा घेतला.

# खेडची लढाई (१२ ऑक्टोबर,१७०७)

- ताराबाईनी मोठ्या तडफेने शाहूंबरोबर लढण्याची तयारी केली याच काळात रामचंद्र पंत आमात्य व परशुराम पंतप्रतिनिधी यांच्यातील वाद वाढत गेला व ताराबाई परशुराम प्रतिनिधीच्या सल्ल्याने वागत असल्यामुळे रामचंद्र पंतांना शाहूंकडे जाण्याचा मार्ग अनुकूल होत गेला.
- हे ताराबाईच्या लक्ष येताच त्यांनी रामचंद्र पंत अमात्यास कराड जवळ वसंत गडावर कैद केले त्याचा परिणाम ताराबाईच्या सरदारांमध्ये झाला व त्यांच्यात दुफळी निर्माण झाली. धनाजी जाधवाची सुद्धा संभ्रमावस्था झाली होती. ताराबाईनी सेनापती धनाजी जाधव व परशुरामपंत यास ४० हजार फौज देऊन त्यांना शाहूंचा मोड करण्यास पाठवले.
- ताराबाईची लष्कर पुणे मार्गे आपणावर चाल करून येत आहे हे समजतास शाहुनी भीमा नदीच्या काठी खेड येथे तळ दिला व धनाजी जाधव व परशुरामपंत प्रतिनिधी शाहून वर चालून गेले. भीमा नदीच्या दोन्ही कट दोघांच्या दोन फौजा होत्या.
- ***जिकडे धनाजी तिकडे विजय*** ठरत होता. शाहूंच्या पक्षात युद्धापूर्वीच बाळाजी विश्वनाथ, खंडोबल्लाळ चिटणीस सामील झाले होते. शाहून त्यांच्या माध्यमातून धनाजी सोबत संपर्क साधला व द्विधा अवस्थेतील धनाजी जाधवास व इतर मराठा सरदाराना त्याने आपल्या बाजूस वळवले.
- धनाजी जाधव यांची व शाहू याच्यात गुप्त भेट झाली व योग्य वेळी पक्षात येण्याचे आश्वासन धनाजीने दिले १२ ऑक्टोंबर, १७०७ मध्ये शाहू व ताराबाईच्या सैन्यात युद्ध सुरु झाले युद्धाच्या वेळी धनाजी जाधवानी ताराबाईच्या पक्ष सोडल्यावर शाहूच्या बाजूने गेले रणभूमीवर तटस्थ राहिले प्रतिनिधी शाहूंविरूध्द निकराने लढले परंतु यात शाहूंचा विजय झाला व शाहूंच्या राजकीय कारकिर्दीस प्रारंभ झाला.

# सरसेनापती धनाजी जाधव





# छत्रपती शाहूंचा राज्याभिषेक (१२ जानेवारी,१७०८)

- खेडच्या विजयानंतर शाहूनी ताराबाईन विरुद्ध आक्रमक पवित्र घेतला.
- यानंतर शाहूंनी सिंहगड,तोरणा,राजगड,पुरंदर किल्ले व त्याखालचा प्रदेश घेतला.
- वाई परगण्यातील चंदन – वंदन वैराटगड घेऊन नोव्हेंबर १७०७ मध्ये साताऱ्यास पोहोचले. शाहू साताऱ्याला पोहोचण्यापूर्वीच राजधानी साताराच्या संरक्षणाची जबाबदारी परशुरामपंत प्रतिनिधींवर सोपवून ताराराणी पन्हाळा किल्ल्यावरती निघून गेल्या.
- शाहूनी परशुरामपंतास किल्ला स्वाधन करण्याविषयी निरोप दिला पण त्यांनी किल्ला लढण्याचा निर्धार केला.
- मराठ्यांची राजधानी शाहूंच्या ताब्यामध्ये आली परशुरामपंतास कैदेत ठेवले. त्यानंतर शुभमुहूर्तावर माघ शुक्ल-प्रतिपदा सोमवार दिनांक १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूनी स्वतःचा विधीयुक्त राज्याभिषेक करून घेतला. यावेळी आपले अष्टप्रधान मंडळ जाहीर केले.

# छत्रपती शाहूंचे अष्टप्रधान मंडळ

१) प्रतिनिधी – गदाधर प्रल्हाद

२) पेशवा – बहिरोपंत पिंगळे

३) सेनापती – धनाजी जाधव

४) अमात्य – बाळकृष्ण हणमंते


५) सचिव – नरोशंकर

६) सुमंत –महादजी गदाधर

७) मंत्री – रामचंद्रपंत पुंडे

# किल्ले सिंहगड, तोरणा, राजगड, पुरंदर किल्ला









# किल्ले पन्हाळा व रांगणा





## छ. शाहू व ताराबाई बादशाही सनदांच्या प्रयत्नात

- शाहूंची सुटका करून आजमशहा दिल्लीची गादी मिळविण्यासाठी दिल्लीकडे जात असता आग्र्याजवळ शहाआलमच्या फौजेबरोबर त्याची लढाई झाली. यात आजमशहा मारला गेला शहाआलम विजयी झाला.

- त्याने दिल्ली ताब्यात घेतली. स्वत: बहादूरशहा पदवी धारण करून दिल्लीचा बादशहा झाला.

- बहादूरशहास आता विरोधक राहिला नाही. या युद्धात नेमाजी शिंद्याने चांगला पराक्रम गाजवला. त्यामुळे बहादूरशहाचे मत शाहूविषयी चांगले बनले होते. हैद्राबादमधून उत्तरेकडे जात असता मे, १७०९ रोजी बहादूरशहाचा मुक्काम अहमदनगर येथे पडला. याच ठिकाणी छ. शाहूंच्या वतीने त्याचा प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद, रायभानजी भोसले व मदनसिंग (शाहूंचा अनौरस सावत्र भाऊ) यांनी बहादूरशहाची भेट घेऊन दक्षिणेच्या सहा सुभ्यांच्या चौथाई व सरदेशमुखी सनदांची मागणी केली.

- दक्षिणेची माहिती असणाऱ्या व राजकारण जाणणाऱ्या झुल्फिकारखानाने शाहूंना सनदा देण्याविषयी सुचविले. बादशहा अनुकूल झाला. पण नेमके याच वेळी ताराबाईच्या अहमदनगर येथे आलेल्या वकिलांनी ताराबाईच्या वतीने दक्षिणेच्या सहा सुभ्यांच्या चौथाई-सरदेशमुखीच्या सनदा मागितल्या..

- त्याने बादशहास सुचविले की, शाहू व ताराबाई यांच्यात सुरू असलेल्या संघर्षात जो यशस्वी होईल त्याला बादशहांनी सनदा द्याव्यात. बादशहाला हा सल्ला पटला.



कामबक्ष आपल्या मोठ्या भावाविरुद्ध लढाईत आपल्या सैन्याचे नेतृत्व करत असल्याची प्रतिमा

## ताराबाईचा छ. शाहूंना प्रखर विरोध.

- आपणास दक्षिणेकडील सुभ्यांच्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळतील अशी छ. शाहूंची फार आशा होती. पण त्यात त्यांची घोर निराशा झाली.
- ताराबाईनी पन्हाळा व विशाळगड हे दोन किल्ले घेऊन कोल्हापूर प्रांतात आपले बस्तान बसविले. शाहूंना मिळणाऱ्या सनदांना खो घातला. ताराबाईनी शाहूंच्या विरोधात झंजावाती वादळ निर्माण करून शाहूंना प्रखर विरोध करण्यास प्रारंभ केला.
- छ. शाहूंचा सेनापती चंद्रसेन जाधव यास फितवून अनेक मराठा सरदारांना शाहूंच्या विरोधी केले.धनाजी जाधवाच्या मृत्यूनंतर छ. शाहूंनी त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधवास नोव्हेंबर, १७०८ मध्ये आपला सेनापती केले. सेनापती चंद्रसेन जाधव पराक्रमी, शूर, धाडसी व कर्तबगार होता. पण आतून त्याचा ओढा ताराबाईकडे होता. प्रारंभी त्याने छ. शाहूंच्या आज्ञाने चाकण, जुन्नर व वाई प्रदेशावर शाहूंचे वर्चस्व प्रस्थापित केले. अनेक मुघल ठाणेदारांना हुसकावून लावले.
- इ. स. १७१० मध्ये ताराबाईनी पन्हाळा येथे आपला मुलगा शिवाजी यांच्यासाठी स्वतंत्र राज्याची स्थापना केली.
- दोन सत्ता केंद्रातून महसुलाबाबत परस्परविरोधी हुकूम सुटत त्यामुळे मराठा सरदार व वतनदार गोंधळून जात. त्यांना निर्णय घेणे अवघड होई. ते दोन्हीकडे संधान बांधून असत. या संधीचा फायदा अनेक संधिसाधू सरदारांनी घेतला व स्वतःचा स्वार्थ साधला.

- छ. शाहूंनी बाळाजी विश्वनाथाना 'सेनाकर्ते' पद दिल्यामुळे बाळाजींचा कमालीचा द्वेष करीत होते व बाळाजी तेथून पुरंदरच्या किल्ल्यावरून पांडवगडास गेले. छ. शाहूंनी त्यांची सुटका करून त्यांस आश्रय दिल्याने चंद्रसेन संतापला..

  उलट चंद्रसेनने छ. शाहूंकडे बाळाजींची मागणी केली व टोकाचा निरोप पाठविला. ***"बाळाजीस आमच्या स्वाधीन करावे अन्यथा स्वामींचे पाय आम्हांस सुटतील"*** य परिस्थितीत छ. शाहूंनी एकनिष्ठ बाळाजींची बाजू घेतली.

  छ. शाहूंचा सेनापती चंद्रसेन इ.स. १७११ मध्ये उघडपणे ताराबाईच्या बाजूस जाऊन मिळाला. ताराबाईनी त्यास सेनापती बनवले. चंद्रसेनने आता मोठ्या उमेदीने शाहूंच्या सरदारांना फोडणे व शाहूंच्य घुमाकूळ घालण्यास सुरुवात केली. या वेळी छ. शाहूंची स्थिती नाजूक झाली.

  अशा परिस्थितीत बाळाजी विश्वनाथांनी मोठ्या धैर्याने, निष्ठेने, पराक्रमाने व मुत्सद्देगिरीने ओढवलेल्या सर्व संकटांवर मात केली व शाहूंचा पक्ष हळूहळू बळकट केला. शाहूंनी रिकामे झालेले सेनापतीपद चंद्रसेन जाधवाचा भाऊ संताजी जाधव यास दिले.

# कोल्हापूरची राज्यक्रांती - ताराबाईच्या सत्तेचा अंत (इ.स. १७१४)

- चंद्रसेन जाधव ताराबाईच्या बाजूस गेल्या नंतर ताराबाईनी त्यास सेनापतीपद दिले. ताराबाईच्या पक्षातील मूळचे जुने सरदार व मुत्सद्दी नाराज झाले होते. त्यातच पुढे ताराबाई यांचे न पटल्याने चंद्रसेन ताराबाईचा पक्ष सोडून निजाम-उल्-मुल्ककडे गेला.

- ऑगस्ट ते ऑक्टोबर, १७१४ च्यादरम्यान कोल्हापूर येथे एक महत्त्वाची राज्यक्रांती घडून आली. छ. राजारामाची दुसरी पत्नी कागलकर घाटगे घराण्यातील राजसबाई व तिचा मुलगा यांनी गुप्तपणे कट रचून ताराबाईच्या पक्षातील लोकांना वश केले आणि कोल्हापूरची राजसत्ता आपल्या हाती घेतली.

- ताराबाई व तिचा मुलगा शिवाजी यांना पन्हाळगडावर कैदेत ठेऊन. कोल्हापूर गादीचा वारस म्हणून संभाजीचा राज्याभिषेक केला.

- या संदर्भात इतिहासकार **स. मा. गर्गे** म्हणतात की, ***'या सत्तांतरात रामचंद्रपंतानी राजसबाईस सक्रिय साहाय्य केल असावे..... रामचंद्रपंताचे पाठबळ असल्याशिवाय एवढी मोठी क्रांती घडून आली वाटत नाही'***

- कोल्हापूरकर छ. संभाजीनी ताराबाईचे छ. शाहूंना विरोध करण्याचे धोरण चालूच ठेवले. पण त्या विरोधस पूर्वीइतकी तीव्रता राहिली नाही.अशा प्रकारे इ. स १७१४ मध्ये शाहू आणि ताराबाई यांच्यातील यादवीचा शेवट झाला

- शाहू व ताराबाई यांच्यातील यादवीचा शेवट झाला.व पुढे छ. शाहूंचे पेशवे बाळाजी विश्वनाथांनी इ.स. १७१९ मध्ये दिल्लीच्या बादशहाकडून छ. शाहूंच्या नावे दक्षिणेच्या सहा सुभ्यांच्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. त्यामुळे वारसाहक्काच्या यादवी युद्धात छ. शाहूंचे वर्चस्व सिद्ध झाले. तरीसुद्धा खऱ्या अर्थाने वारणेच्या तहानंतर म्हणजे इ.स. १७३१ नंतर सातारा व कोल्हापूर यांच्यात सुरू असलेल्या यादवीस पूर्णविराम मिळाला

# यादवी युद्धाचे परिणाम

१. शाहूंची मुघली कैदेतून सुटका झाल्यानंतर ताराबाईंनी मराठ्यांच्या राज्यावरील त्याचा कायदेशीर वारसाहक्क डावलला व त्याच्याबरोबर संघर्ष केला. या संघर्षात दोघेही शिवाजीराजांचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व विसरले व मुघलांचे चाकर बनण्यास तयार झाले.

२.मराठा सरदारांच्या या स्वार्थी व संकुचित वृत्तीमुळे मराठाशाहीच्या -हासाचे बिजारोपणयेथेच झाले.

३. मराठा राज्यात दोन सत्ताकेंद्रे निर्माण झाली. मराठा राज्याचे दोन तुकडे झाले. त्यांच्यात सतत संघर्ष होत राहिला त्यामुळे मराठी राज्याचे खच्चीकरण झाले.

४. छ. शाहूंच्या पेशव्यांनी पुढे उत्तर हिंदुस्थानात साम्राज्यविस्तार केला पण त्या वेळी त्यांना सतत दक्षिणेची चिंता राहिली. परिणामी, मराठे उत्तरेत लवकर स्थिर होऊ शकले नाहीत.

५. मराठ्यांच्या या यादवीचा फायदा खऱ्या अर्थाने या काळातील मराठ्यांचा शत्रू निजाम- उल-मुल्क याने करून घेतला.

६. मराठ्यांच्यातील या यादवीमुळे मराठ्यांचे शत्रू सिद्दी व पोर्तुगीज यांनी आपल्या सत्ता प्रबळ केल्या. परिणामी, शेवटपर्यंत ते मराठ्यांना त्रास देत राहिले.

# बाळाजी विश्वनाथ





पुण्यातील पार्वती टेकडी येथील पेशवे स्मारकातील बालाजी विश्वनाथ यांचे चित्र

मराठ्यांच्या इतिहासाचे शिवशाही व पेशवाई असे दोन भाग पडतात. पेशव्यांचा उदय ही मराठेशाहीतील अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. पेशवा म्हणजे छत्रपतींच्या अष्टप्रधान मंडळातील मुख्य प्रधान.अष्टप्रधान मंडळाचा प्रमुख म्हणजे पेशवा.

शिवशाहीत छत्रपतींनी कोणतेही पद वंशपरंपरेने दिले नाही पण छ. शाहूंनी आपल्या कारकिर्दीत अष्टप्रधानातील पदे वंशपरंपरेने दिली. या अष्टप्रधान मंडळात पेशवेपद भट घराण्यात वंशपरंपरेने दिले. या पेशवेपदावरील व्यक्ती कर्तबगार निघाल्या.

छत्रपतींचा मुख्य प्रधान या नात्याने बदलत्या काळात हळूहळू सर्व सत्ता सूत्रे पेशव्यांच्या हातात आली. पेशवे मराठा राज्याचे कर्ते व राज्यचालक बनले. छत्रपतींची सत्ता कमकुवत बनत गेली. म्हणून पेशव्यांच्या कर्तबगारीच्या काळास मराठाशाहीत पेशवाई काळ म्हटले जाते.

या पेशवाईचा मूळ पुरुष बाळाजी विश्वनाथ भट हा होय. छ. शाहूंच्या सुटकेनंतर एका विशिष्ट परिस्थितीमुळे बाळाजी विश्वनाथांचा व पेशवाईचा उदय मराठ्यांच्या राज्यात झाला.

# बाळाजी विश्वनाथ व पेशवाईच्या उदयाची कारणे

१. मराठ्यांचे यादवी युद्ध :

२. छ. शाहूंच्या अडचणी :

३. मराठा सरदारांचा स्वार्थ :

४. छ. शाहूंचा स्वभाव :


५. छत्रपतींच्या अष्टप्रधानांचा दुबळेपणा :

६. निजाम-उल्-मुल्कची कारस्थाने व मुत्सद्देगिरी :

७. कर्तबगार पेशवे :

# बाळाजी विश्वनाथांचे प्रारंभीचे कार्य

- बाळाजी विश्वनाथांचे मूळ भट घराणे कोकणातील श्रीवर्धनचे.याच चित्पावन ब्राह्मण घराण्यात बाळाजी विश्वनाथांचा जन्म सन १६६० च्या सुमारास झाला असावा. सिद्दींनी या भट घराण्यावर अन्याय व अत्याचार केला. या त्रासाला कंटाळून बाळाजी विश्वनाथ भानू बंधूच्यासह कोकणातून देशावर स्वराज्यात आले.








- छ. संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर मुघल-मराठा संघर्ष तीव्र बनला होता. मराठा स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले होते. या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात रामचंद्रपंत अमात्याच्या हाताखाली महाराष्ट्रातील अनेक घराणी व कर्ते पुरुष यांचा उदय झाला.
- अशा कर्त्या पुरुषांमध्ये विश्वनाथांचा समावेश होतो. सन १६८९ च्या दरम्यान बाळाजी विश्वनाथ रामचंद्रपंताच्या हात पुरंदरचा वसुली कारकून म्हणून नोकरीस राहिले.
- मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात सेनापती धनाजी जाधव व बाळाजी संबंध आला.
- सन १६९६ ते १७०७ या काळात ते पुणे व नगर ते दौलताब प्रांताचा सुभेदार होते. या प्रदेशातील वसुलाचे अवघड काम त्याने त्या प्रदेशात मुघलांचा वावर असतानाही पार पाडले.
- इ. स. १७०३ ते १७०७ या काळात औरंगजेबाचा तळसुद्धा याच प्रदेशात होता. याच काळात अनेक मुघल सरदार व अधिकारी यांचा त्यांच्याशी परिचय झाला मुघल कैदेतील शाहूंचा संबंधसुद्धा त्यांच्याशी याच काळात आला असावा. त्यांच्यात असणाऱ्या अनेक गुणांमुळे त्यांची झपाट्याने प्रगती झाली. संकटकाळी शाहूंची बाजू सावरली

# संकटकाळी शाहूंची बाजू सावरली

- शाहूंच्या सुटकेनंतर मराठी राज्यात शाहू व ताराबाई यांच्यात संघर्ष सुरू झाला. येथील युद्धाच्यावेळी खंडोबल्लाळ चिटणीस व बाळाजी विश्वनाथ यांनी सेनापती धनाजी जाधवास शाहूंच्या बाजूस वळविले. शाहूंचा विजय निश्चित झाला. बाळाजी विश्वनाथाने शाहूंची बाजू सावरण्यासाठी केलेली ही पहिली महत्त्व कामगिरी होय.
- खेड युद्धात शाहूंचा विजय झाला १२ जानेवारी  १७०८ रोजी शाहूंनी स्वत:स राज्याभिषेक करून घेतला. शाहूंना छत्रपती करण्यात बाळाजीनी मोठे योगदान दिले होते.
- छ. शाहूंनी ताराबाईचा बंदोबस्त करण्यासाठी पन्हाळा रांगण्या मोहीम काढली.चंद्रसेन जाधव बाळाजींचा द्वेष व मत्सर करत असे तसेच तो छ. शाहूवरसुद्धा नाराज होता
- . चंद्रसेन जाधव सर्व मराठा सरदारांचा प्रमुख होता. अनेक मराठा सरदार शाहूंबर होते. ते सर्व बाळाजींचा द्वेष करत. याच दरम्यान कराडजवळील हरणाच्या शिकारीच्या क्षुल्लक तंट्यावरून चंद्रसेन बाळाजी संघर्ष विकोपास गेला. चंद्रसेनने बाळाजींवर फौज पाठविली.
- बाळाजी शाहूंकडे आश्रयास गेले. तिथे शाहूनी बाळाजींची बाजू घेतली.

## बाळाजी विश्वनाथांस पेशवेपदाची प्राप्ती (१७ नोव्हेंबर, १७१३)

छ. शाहू व कान्होजी आंग्रे सलोखा (८ फेब्रुवारी, १७१४)

- दमाजी थोरातांचा बंदोबस्त :
- रंभाजी निंबाळकर
- उदाजी चव्हाण
- बाळाजींची दिल्ली स्वारी (नोव्हेंबर, १७१८)

# छ. शाहू - मुघल संबंध (१७१५ १७२०)

- १. सय्यद हुसेन अली दक्षिणेचा सुभेदार (१७१५ ते १७१८) :

- मुघल बादशहा बहादूरशहा सन १७१२ मध्ये मृत्यू पावला. त्यानंतर त्याचा ज्येष्ठ मुलगा जहांदरशहा बादशहा झाला.

- मुघल दरबारात कटकारस्थानांना ऊत आला होता. नवा बादशहां जहांदरशहा याने तुराणी सरदारांच्या पाठिंब्याने ११ महिनेच बादशाही भोगली. इ.स. १७१३ मध्ये सय्यद बंधू सय्यद अब्दुल्ला (सय्यद हसन अली) व सय्यद हुसेन अली यांनी बादशहा जहांदरशहा व त्याच पाठीराखा झुल्फिकारखान यांना ठार मारून फर्रुखसेयर यास दिल्लीचा बादशहा केले.

- मराठ्यांच्या दिल्लीच्या कारभारात प्रवेश होण्यास हेच सय्यद बंधू कारणीभूत आहेत बादशहा फर्रुखसेयरने दक्षिणेचा मुघल सभेदार दाऊतखान पन्नी याची नेमणूक दक्षिण सुभ्यावरून गुजरात सुभ्यावर केली व त्याच्या जागी दक्षिणेचा सुभेदार म्हणून निजाम उल मुल्क याची नेमणूक फेब्रुवारी, १७१३ मध्ये केली.

- निजाम मराठ्यांचा कट्टर विरोधक होता. त्याला दक्षिणेत स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करावयाचे होते. त्याने मराठ्यांच्या दुहीचा फायदा घेऊन अनेक मराठा सरदारांना शाहूंच्या विरोधी कारस्थाने करण्यासाठी फूस दिली. दिल्लीत फर्रुखसेयर बादशहा व सय्यद बंधू यांचे पटेनासे झाले. त्यांच्यात तीव्र मतभेद झाले.

- बादशहास सय्यद बंधूचे वर्चस्व सहन होईना त्याने त्यांच्या खच्चीकरणास सुरुवात केली. त्यांच्या शक्तीचे विभाजन करण्यासाठी बादशहाने सय्यद हुसेन अलीस निजामाच्या जागी दक्षिणेचा सुभेदार म्हणून मे, १७१५ मध्ये नियुक्त केले. निजामाला मुरादाबादच्या सुभ्यावर पाठवले..

## सय्यद हुसेन अली दक्षिणेचा सुभेदार (१७१५ ते १७१८)



- हुसेन अली दक्षिणेचा सुभेदार झाला. बादशहाने शाहूंनासुद्धा हुसेन अलीचा काटा काढण्यास सांगितले होते. हुसेन अली मराठ्यांचा विरोधक होता पण तो दक्षिणेत आल्यानंतर मराठ्याची ताकद त्याच्या लक्षात आली.
- तसेच बादशहा आपणास संपवण्याचा प्रयत्न करीत आहे हे त्याच्या लक्षात आले. म्हणून त्याने मराठ्यांच्या बरोबर सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले. हुसेन अलीने मराठ्यांची मदत बादशहा विरुद्ध घेण्याचा विचार करून त्यांच्याशी तहाची बोलणी सुरू केली. त्यात त्याला यश आले.
- मराठ्यांनासुद्धा या वेळी बादशहाबरोबर सलोख्याचे संबंध हवे होते. त्यानुसार हुसेन अलीने बादशहाच्या वतीने छ. शाहूंबरोबर तह केला.



नवाब दाऊद खान पन्नी, मुघल भारत, हैदराबाद, डेक्कन, भारत (1756) मध्ये चित्रित केलेले पोर्ट्रेट

## • २. सय्यद हुसेन अली व छ. शाहू यांच्यातील तह (१७१८) :

हा तह घडवून आणण्याचे बरेचसे श्रेय शंकरजी मल्हार याच्याकडे जाते. छ. राजारामांच्या काळातील शंकरजी मल्हार मुत्सद्दी सरदार होता. तो काशीहून दिल्लीस गेला होता आणि हुसेन अलीबरोबर दक्षिणेत आला होता. त्याने बाळाजमार्फत छ. शाहूंबरोबर तहाच्या वाटाघाटी केल्या व तहास अंतिम स्वरूप दिले. हुसेन अलीमार्फत बादशहा व शाहू यांच्यात पुढील प्रमाणे तह झाला.

१. छ. शाहूंना सर्व गडकोटासह शिवाजीराजांचे स्वराज्य मिळावे.

२. मराठा सरदारांनी जिंकलेले प्रदेश, खानदेश, गोंडवन, वऱ्हाड, हैद्राबाद व कर्नाटक हे प्रदेश स्वराज्यात दाखल करावेत.

३. दक्षिणेतील सहा सुभ्यांची चौथाई व सरदेशमुखी मराठ्यांनी वसूल करावी.


४. चौथाई व सरदेशमुखीच्या मोबदल्यात शाहूंनी १५००० फौज मोगलांच्या मदतीस ठेवावी आणि दक्षिणेतील बंदोबस्त ठेवावा.

५. शाहूंनी कोल्हापूरच्या संभाजीस उपद्रव करू नये.

६. मराठ्यांनी दरसाल बादशहास १० लाख रुपये खंडणी द्यावी.

७. शाहूंची आई येसूबाई व इतर कैद्यांची मोगल कैदेतून सुटका व्हावी.

बाळाजींची दिल्ली स्वारी




INDIA in 1751.
17.
AFGHANS
Kabul
Kandahar
R. Indus
R. Jhelum
R. Chenab
Lahore
R. Ravi
R. Bias
Multan
R. Sutlej
Delhi
ROHILLAS
Bareilly
RAJPUTS
JATS
OUDH
Jodhpur
Ajmere
Jaipur
Agra
Lucknow
R. Gogra
Cawnpur
R. Gumti
R. Chambal
Gwalior
Allahabad
Benares
Patna
BEHAR
R. Ganges
Murshidabad
BENGAL
Chandarnagar
Calcutta
Udaipur
Seronji
Ahmadabad
Indore
Bhopal
MAHRATTA
CONFEDERACY
Junagarh
Somnath
Diu
Daman
Broach
Surat
R. Tapti
Nagpur
R. Mahanadi
Balasor
Cuttack
Bassein
Salsette
Bombay
Aurangabad
R. Godavari
Puna
NIZAM'S
Haidarabad
DOMINIONS
Satara
R. Bhima
Gheria
Kolhapur
CIRCARS
ARABIAN
SEA
BAY OF
BENGAL
Goa
R. Kistna
MYSORE
CARNATIC
POLYGARS
TRAVANCORE
Mangalore
Mahe
Madras
Fort St. David
Pondicherry
Devicota
Karikal
Tanjore
Sphere of French Influence
Remnant of the Moghul Empire
English Miles
Justus Perthes, Gotha.

## ४. चौथाई व सरदेशमुखी सनदांची प्राप्ती (मार्च, १७१९) :

- ❖बादशहा फर्रुखसियर व सय्यद बंधू यांचा संघर्ष विकोपाला गेला. सय्यद बंधूनी फर्रुखसेयरला कैद करून 'रफ्फी उदरजीत' यास बादशहा केले. या वेळी मुघल फौज व मराठा फौज यांच्यात संघर्ष झाला. तहात ठरल्याप्रमाणे मराठ्यांनी चौथाई, सरदेशमुखी व स्वराज्य अशा तीन प्रकारच्या सनदा लिखित स्वरूपात नव्या बादशहाकडून घेतल्या.
- ❖राजमाता येसूबाई व इतर राजकुटुंबातील कैद्याची मुक्तता केली. सय्यद बंधूनी सनदा, राजमाता येसूबाई इतर कैदी बाळाजींच्या स्वाधीन केले. मार्च, १७१९ च्या अखेरीस बाळाजींनी दिल्ली सोडली ४ जुलै, १७१९ रोजी ते साताऱ्यात पोहोचले.
- ❖ बाळाजींस पाच महालांचे सरदेशमुखीचे वतन करून दिले. बाळाजींनी सनदा, राजमाता येसूबाई तसेच तीस लाख रुपये रोख आणले. अशा प्रकारे बाळाजी विश्वनाथांची दिल्लीची स्वारी पूर्ण यशस्वी झाली.



**'रफ्फी उदरजीत'**

- **मराठा राजमंडळाचा /राज्य संघाचा उदय (Rise of Maratha Confederacy)**

- छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर हत्येनंतर राजाराम महाराज मराठ्यांचे छत्रपती झाले.
- राणी येसूबाईच्या नेतृत्वाखाली राजाराम, मराठा मुत्सद्दी व सरदार यांनी कोणत्याही परिस्थितीत मुघलांच्या पुढे शरणागती स्वीकारायची नाही हा निर्धार केला होता.
- औरंगजेबच्या तीव्र व स्वातंत्र्याचे रक्षण करणे हेच एकमेव ध्येय मराठ्यांच्या पुढे होते, कर्नाल्यातून स्वराज्याचे जिंजी येथे मराठ्यांची राजधानी निर्माण करून छ. राजारामांनी स्वातंत्र्ययुद्धाचे नेतृत्व केले.
- बदललेल्या परिस्थितीत छ. राजाराम व मराठा मुत्सद्द्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी व मुघलांचे आक्रमण थोपवून त्यांना पराभूत करण्यासाठी मराठा सरदारांना जहागिरी देण्याची पद्धत सुरू केली.
- उदा. कर्नाटक-घोरपडे, वऱ्हाड-नागपूर, बागलाण- सरलष्कर निंबाळकर, गुजरात - सेनापती दाभाडे. अशा प्रकारे जहागिऱ्या देऊन त्यांना त्या-त्या प्रदेशातून मुघल फौजांना हुसकावून लावणे, तो प्रदेश ताब्यात घेऊन तेथे आपली ठाणी निर्माण करण्याविषयीच्या आज्ञा केल्या. वतनास लोभी असणाऱ्या मराठ्यांनी निकराने झुंजून तो प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणला

१) पेशवा – बालाघाट

२) सेनापती दाभाडे – गुजरात व बागलाण

३) सेनासाहेब सुभा भोसले – वऱ्हाड, नागपूर व गोंडवन

४) सरलष्कर निंबाळकर - गंगथडी व औरंगाबाद

५) प्रतिनिधी - नीरा व वारणा यामधील प्रदेश व बिदर

६) आंग्रे - कोकण किनारपट्टी

७) फत्तेसिंग भोसले - अक्कलकोट व कर्नाटक

८) सचिव नारोशंकर - भोर व पुण्याच्या दक्षिणेकडील प्रदेश

९) घोरपडे - कृष्णा नदीच्या दक्षिणेस कर्नाटक

पुढीलप्रमाणे जहागिरींना मान्यता दिल्यानंतर मराठा राजमंडळासंदर्भात काही बाबी ठरवण्यात आल्या.

- सर्व मराठा सरदारानी ऐक्य भावनेने वागावे. सर्वांनी छत्रपतींशी एकनिष्ठ राहावे. मराठ्यांचे राज्य वृद्धिंगत करावे. सर्वांनी छत्रपतींच्या आज्ञा पाळाव्यात.
- तसेच जहागीरदारांनी जहागिरीतून वसूल केलेल्या महसुलाचा हिशेब काटेकोर ठेवावा.
- त्या वसुलाची विभागणी पुढीलप्रमाणे असावी. वसुलाचा ६६% भाग फौजेच्या खर्चासाठी सरदारांनी स्वत:कडे ठेवावा, ३४% छत्रपतींस द्यावा.
- मराठा सरदारांनी एकमेकाच्या प्रदेशावर हल्ला करू नये. तसेच शेजारच्या जहागिरीत ढवळाढवळ करू नये.

- **बाळाजी विश्वनाथांचा मृत्यू**

- ❑बाळाजी विश्वनाथ सनदा घेऊन दिल्लीहून परत आल्यानंतर छ. शाहूंनी त्यांस कोल्हापूरकर संभाजीचा बंदोबस्त करण्यासाठी पाठविले. वारणातीरी वडगाव येथे बाळाजींनी संभाजीचा पराभव केला.
- ❑बाळाजींनी तडफेने कोल्हापूरला वेढा दिला. याच काळात ते आजारी पडले म्हणून सासवडला परत आले. सासवड येथेच २ एप्रिल, १७२० रोजी बाळाजींचा मृत्यू झाला.



श्रीवर्धन, महाराष्ट्रातील बाळाजी विश्वनाथ यांचा पुतळा

## • छ . शाहू व कोल्हापूरकर छ. संभाजी संघर्ष

❖इ. स. १७१४ मध्ये कोल्हापुरात क्रांती होऊन ताराबाई व तिचा पुत्र शिवाजी दुसरा यांना राजसबाई व तिचा पुत्र संभाजी यांनी कैद केले. संभाजी कोल्हापूर गादीचा छत्रपती झाला.

❖त्यानी ताराबाईप्रमाणे छ. शाहूंबरोबर संघर्षाचा पवित्रा घेतला. यादवी सुरू ठेवली.

❖इ.स. १७२९-३० मध्ये बाजीराव पेशवे माळव्याच्या मोहिमेवर होते. हे पाहून छ. संभाजी व उदाजी चव्हाण यांनी छ. शाहूंच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. छ. शाहूंनी कोल्हापूर संभाजी विरुद्ध मोहीम उघडली. या मोहिमेचे नेतृत्व श्रीपतराव प्रतिनिधीकडे होते.

❖छ. संभाजीचा पूर्ण पराभव झाला. संभाजी व उदाजी पन्हाळ्यावर पळून गेले. संभाजीच्या राण्या व ताराबाई शाहूंच्या हाती सापडल्या. छ. शाहूनी राण्यांची रवानगी सन्मानाने पन्हाळ्यावर केली. ताराबाईच्या इच्छेनुसार त्यांना सातारा येथे ठेवले.

❖कोल्हापूरची गादी बरखास्त करण्याची शाहूंची इच्छा नव्हती म्हणून छ. संभाजी तहास तयार झाला. २७ फेब्रुवारी, १७३१ रोजी कराडजवळ जखीणवाडी येथे उभय बंधूंची शाही भेट झाली. संभाजी दोन महिने सातारा येथे राहिला. दोघांत वाटाघाटी होऊन १३ एप्रिल, १७३१ रोजी वारणेचा तह झाला.

## वारणेचा तह (१३ एप्रिल, १७३१)

**"तहनामा चिरंजीव राजश्री संभाजीराजे यांसी प्रति शाहूराजे यांनी लिहून दिला सु।**

१. इलाखा वारुण महाल (बत्तीसशिराळा) तहत संगम (कृष्णा व वारणासंगम) दक्षिणतीर कुल दुतर्फा मुलूख दरोबस्तदेखील व किल्ले तुम्हास दिले असत.

२. तुंगभद्रेपासून तहत रामेश्वरदेखील संस्थाने आम्हाकडे ठेवून निम्मे तुम्हाकडे करार दिले असत.

३. किल्ले कोपल तुम्हाकडे दिला त्याचा मोबदला तुम्ही रत्नागिरी आम्हाकडे दिले.

४. वडगाव ठाणे पाडून टाकावे.

५. तुम्हाशी जे वैर करतील त्याचे पारिपत्य आम्ही करावे. आम्हाशी वैर करतील त्याचे पारिपत्य तुम्ही करावे. तुम्ही आम्ही एक विचारे राज्यांभिवृद्धी करावी.

६. वारणेच्या व कृष्णेच्या संगमापासून दक्षिण तीर तहत तुंगभद्रेपावेतो दरोबस्तदेखील गड ठायी तुम्हाकडे दिली असत.

७. कोकण प्रांत साळशीपलीकडे तहत पंचमहाल अकोलेपावेतो बरोबर तुम्हाकडे दिले असत.

८.इकडील चाकर तुम्ही ठेवू नये, तुम्हाकडील चाकर आम्ही ठेवू नये

९.मिरज प्रांत, विजापूर प्रांताची ठाणीदेखील अथणी, तासगाव वगैरे तुम्ही आमचे स्वाधीन यास करावी.

एकूण कलमे नऊ करार करून तहनामा दिला असे सदरहूप्रमाणे आम्ही चालू अंतराय होणार नाही.

वारणेच्या तहानुसार दोन्ही राज्यांची सरहद्द वारणानदी ठरली.

- **वारणा तहाचे परिणाम:**

१. सातारा व कोल्हापूर मध्ये सन १७०७ पासून सुरू असलेली यादवी पूर्णपणे संपुष्टात आली.

२. या तहानंतर छ. संभाजीने कधीही परकीय सत्तेची मदत घेतली नाही.

३. छ. संभाजीने छ. शाहूंबरोबरचे शत्रुत्व कायमचे सोडून दिले.

४. या तहाने संभाजीस दुय्यम स्थान प्राप्त झाले व शाहू हेच खरे छत्रपती ठरले.

५. छ. संभाजीस मिळालेल्या प्रदेशावर संतोष मानावा लागला.

६. मराठ्यांच्यामधील यादवी संपल्यामुळे मराठ्यांना उत्तरेचा राज्यविस्ताराचा मार्ग मोकळा झाला.

७. मराठ्यांच्या दोन गाद्यांत दिलजमाई होऊन शांतता प्रस्थापित झाली.

**********************************************************************


Thank you!